**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : राजेंद्र महादेव मदने,
वय : ३४ वर्षे,
व्यवसाय : पोलीस कॉन्स्टेबल, बक्कल नं. २६९५, पारगाव कारखाना पोलीस स्टेशन,
राहणार : पारगाव, पुणे.

**सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके**

१. मी सन २०२३ मध्ये पारगाव कारखाना पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणुन कार्यरत होतो.

२. दि.०९/०९/२०२३ रोजी सदर घटना घडली. त्या दिवशी ए.पी.आय. थाटे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लोणी गावामध्ये परेश शहा नामक इसम स्थानिक लोकांना अवैधरित्या ताडीची विक्री करीत आहे. त्यावेळी ए.पी.आय. थाटे साहेबांनी मला, पोलीस हवालदार जढर, पोलीस कॉन्स्टेबल साळवे असे आम्हाला तेथे जाऊन कारवाई करण्यास सांगितले. त्यानंतर पोलीस हवालदार जढर यांनी दोन पंचाना बोलावून घेतले. पंचासह आम्ही सर्वजण लागणारे साहित्य घेऊन खाजगी वाहनाने लोणीमध्ये गेलो. तेथे गेल्यानंतर वडाच्या झाडाखाली एक इसम दिसला. त्याला पोलीस हवालदार जढर यांनी नाव विचारले. त्याने त्याचे नाव परेश प्रकाश शहा असे सांगितले. त्या इसमाजवळ प्लास्टिकच्या पिशव्या द्रवाने भरलेल्या दिसल्या. त्याला यामध्ये काय आहे असे विचारले असता त्याने त्याच्यामध्ये ताडी असल्याचे सांगितले.

३. त्यानंतर पोलीस हवालदार जढर यांनी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. सदर मुद्देमाल ताब्यात घेतला. मुद्देमालापैकी एक पिशवी रासायनिक पृथकरणासाठी नमुना म्हणुन काढून घेतली. त्यानंतर मी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

४. आता मला दि.०९/०९/२०२३ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.१०** देण्यात येतो. आता मला दि.०९/०९/२०२३ रोजीची छापिल फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.११** देण्यात येतो. मी आरोपीस पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपी पक्षातर्फे वकील श्री एन. आर. निघोट यांच्यामार्फत</u>**

५. मी फिर्याद देतेवेळी थाटे साहेबांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली हे सांगितले होते. सदर बाब फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी कागदपत्र वाचुन सही करतो. मी फिर्याद वाचुन पाहिल्यानंतर मला सदर मजकुर फिर्यादीत नमुद केला नाही हे दिसले तरीदेखील मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, ठाणे अंमलदाराने त्यांच्या पध्दतीने फिर्याद बनवली व मी त्यावर सही केली.

६. खाजगी वाहन हे पोलीस कॉन्स्टेबल साळवे यांचे होते. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय वाहन पोलीस स्टेशनला दिलेले असते तसेच शासकीय कामासाठी ते वाहन वापरायचे असते. हे म्हणणे खरे आहे की, खाजगी वाहन हे पुर्व परवानगीशिवाय शासकीय कामासाठी वापरता येत नाही. खाजगी वाहन वापरल्यास त्या वाहनाच्या मालकास त्याचे भाडे द्यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, खाजगी वाहन वापरण्याची लेखी परवानगी दिली नव्हती तसेच गाडीचे भाडे दिल्याबाबत कोणताही लेखी पुरावा नाही. मला खाजगी वाहनाचा पुर्ण नंबर सांगता येणार नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, लोणी गाव हे माझे नियमित पाहण्यातले आहे. लोणी गावामध्ये किती वडाची झाडे आहेत हे मी सांगु शकत नाही. पंच हे पोलीस स्टेशनला आले होते. माझ्या समक्ष पंचाना पंचनाम्याकरीता उपस्थित राहण्याचे लेखी पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, अंकुश ज्ञानेश्वर पोखरकर व काळुराम तुकाराम लोढे हे नियमित येणारे पंच

आहे. हे म्हणणे खरे आहे की, पारगाव पोलीस स्टेशन ते लोणी गावच्या दरम्यान वडगाव पिर आणि धामणी ही गावे येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वरीष्ठांच्या आदेशाप्रमाणे खटल्यांमध्ये फिर्यादी व्हावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी न्यायालयासमोर मुद्देमाल व प्लास्टिकची पिवशी नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी अशी कोणती घटना घडली नाही. छापा कारवाईला जाण्याकरीता स्टेशन डायरीला त्याची नोंद करावी लागते. मी वैयक्तिक छापा कारवाईची नोंद स्टेशन डायरीला करु शकत नाही.

८. वर्षाला साधारण ५० ते ६० प्रोहिबिशनच्या केसेस दाखल होतात. हे म्हणणे खरे आहे की, अशा केसेस दाखल नाही झाल्यास वरीष्ठांकडून त्याबाबत कानउघाडणी केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा कोणत्याही प्रकारचा द्रव पदार्थ विकत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दैनंदिन कामकाज म्हणुन सदरचा खटला दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, चुकीची फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. ०६/१०/२०२५**
**घोडेगाव**